# कोरोना आणि राजकीय व्यवस्थेच्या मर्यादा

**प्रा.डॉ. आण्णासाहेब हारदारे**
सहाय्यक प्राध्यापक, शिवराज महाविदयालय, गडहिंग्लज

..............................................................................................................

**प्रस्तावना:**

नव्या दशकाची सुरुवातच म्हणजे २०२०—२०३० ची सुरुवातच कोरोनाच्या हाहाकारात झाली. कारण २०१९ च्या डिसेंबरच्या मध्यावर कोरोना व्हायरसचा एक उपप्रकार चीनमधील वुहान शहरात आढळून आला. याला कोव्हीड—१९ असे नांव देण्यात आले. सुरुवातीस वहान व आसपासच्या प्रदेशात पसरलेला हा विषाणू जानेवारी महिन्यात आखे जग व्यापून घेतले आहे. गेल्या १०० वर्षामध्ये इतका मोठा जागतिक पातळीवर हाहाकार माजवणारा असा महामारीचा रोग आला नव्हता. संपुर्ण जगाला कोरोना या आजाराने विनाषाच्या खाईत लोटले आहे. असा जगात एकही देश नाही ज्या देशामध्ये कोरोना आणि लॉकडाऊन नाही असा नाही. जगावर आणि भारतावर या कोरोनाचे किती दिर्घकाल— परिणाम किंवा कोणता परीणाम होणार आहे. हे सांगणे कठीण आहे असे असले तरी कोरोनाच्या निमित्ताने जागतिक व भारतीय संदर्भात राजकीय व्यवस्थेवर फार मोठा परिणाम झाला आहे. जगाची अर्थव्यवस्था उळमळीत झालीच आहे. त्याचे राजकीय, सामाजिक, मानसिक परिणाम तीव्र होत जाणार आहेत. डिसेंबर २०१९ मध्ये उद्रेकाच्या पारंभापुर्वीचे जगाचे व भारताचे चित्र अवघ्या चार महिन्यात अमुलाग्र बदलून गेले आहे. या काळात जगभरच्या लोकशाही देशामधील संविधानात्मक संस्थाची जी पडझड दिसते ती चिंताजनक आहे. या कोरोनाच्या निमित्ताने प्रतिबंधात्मक उपायांच्या निमित्ताने ज्या राजकीय व्यवस्थेच्या मर्यादा समोर आल्या याचे विवेचन सखोल विवेचन या शोधप्रबंधात केले आहे.

**१) जागतिक महासत्ताच आव्हानीत:**

द्वितीय महायुध्द आणि शीतयुध्दाचा शेवट याचा परिणाम म्हणून अमेरिका जागतिक महासत्ता म्हणून उदयाला आली. ही जागतिक महासत्ता आपले लष्करी सामर्थ, आर्थिक सामर्थ्य आणि विज्ञान तंत्रज्ञान सामर्थ्य या आधारावर जगावर वॉच ठेवून होता. पण कोरोनामुळे ही महासत्ता आज वेठीस धरील आहे. अमेरिकेसारख्या विज्ञान तंत्रज्ञानावर अग्रेसर गणल्या गेलेल्या राष्ट्रासमोर कल्पनेपलीकडची परिस्थिती उद्भवली आहे. कोरोनामुळे अमेरिकेत सध्या शटडाऊन लागू करण्यात आल्याने तेथील नागरीक आपल्या घटनात्मक अधिकारावरती गदा येत असल्याचा दावा करुन काही ठिकाणी रस्त्यावर उतरुन आपला असंतोष व्यक्त करीत आहेत. त्याच बरोबर जगातील कोरोनाची संख्या अमेरिकेतच जास्त असल्यामुळे अमेरिका हे राष्ट्र संपुर्ण जगात महासत्ता म्हणून नावारुपास आले असले तरी त्याचे अस्तीत्व संपुष्टात येण्याची चिन्हे दिसत आहेत. अमेरिकेची राजकीय व्यवस्थाच तिला आव्हान करत आहे. उदा. कठोर संघराज्य व्यवस्थेमुळे लॉकडाऊनचा निर्णय संपुर्ण देशभर लागू करता येत नाही. थोडक्यात कोरोना ग्रस्तांच्या संदर्भाने विचार करता सदोदीत जगाचे नेतृत्व करणाऱ्या मुठ मध्ये राहणाऱ्या अंतिक अशा म्हणून ज्यांच्याकडे अनेक बाबतीत पाहिले जाते तो अमेरिका आज फेल ठरला आहे. आज अमेरिकेला या रोगापासून लष्करी क्षमता, आर्थिक क्षमता वाचवु शकत नाही. त्यामुळे या महामारीच्या निमित्ताने —'जागतिक महासत्तेची' मर्यादा यामुळे स्पष्ट झाली आहे. येथून पुढे जागतिक महासत्ता व्हायचे असले तर सर्वसमावेशक भूमिका व क्षमता गरजेची आहे.

**२) जागतिक संघटना संशयाच्या भोवऱ्यात:**

आंतरराष्ट्रीय राजकारणात बहुराष्ट्रीय संस्था मग ती जागतिक आरोग्य संघटना, मानव अधिकार समिती यासारख्या संघटना कोरोनाच्या निमित्ताने संशयाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष इम्प यांनी कोरोना विषाणूचा उल्लेख 'चायना व्हायरस' असा करत विषाणूच्या थैमानाला चीनच जबाबदार असून जागतिक आरोग्य संघटना चीन धार्जिनी आहे असा अरोप केला तसेच या संघटनेला अमेरिकेकडून देण्यात येणारा निधी कमी केला

जाईल असे सुचीत करण्यात आले. अमेरिकेचे मत आहे की नोव्हेंबरमध्ये चीनच्या वुहान प्रांतात कोरोनाचा पहिला रुग्ण सापडला होता पण जागतिक आरोग्य संघटनेने साडेतीन महिन्यानंतर ११ मार्च रोजी कोरोनाला जागतिक महामारी घोषीत केले. जागतिक आरोग्य संघटना चीनची बाजू उचलून धरत आहे. असा आरोप करुन जागतिक घडामोडीत 'जागतिक आरोग्य संघटना' हा तिसरा खेळाडू या संघर्षाचा भाग झाला आहे ही संघटना संयुक्त राष्ट्र संघाने (युनो) एक महत्त्वपूर्ण अंग असून जागतिक आरोग्य सुरक्षेसंदर्भात आजपर्यंत ही संघटना अत्यंत मोलाची कामगीरी बजावत आली आहे. ट्रम्प यांनी या जागतिक पातळीवरील संघटनेवर तोफ डागळयाने व निधीत कपात करण्याचे जाहीर केल्याने आपोआप या आणीबाणीच्या वेळेस संयुक्त राष्ट्र संघाच्या विश्वासार्हतेवरही प्रश्न चिन्ह निर्माण होवून. जागतिक संघटनेच्या मर्यादाही या काळात स्पष्ट झाल्या आहेत. वास्तविक या सर्व संघटना आंतरराष्ट्रीय राजकारणापासून अलीप्त ठेवल्या पाहिजेत.

**३) सार्वजनिक आरोग्य व्यवस्था:**

कोरोनाच्या काळात भारतीय सार्वजनिक आरोग्य यंत्रणा झपाटयाने काम करताना दिसत आहे. सार्वजनिक आरोग्य सेवेमध्ये काम करणारे सर्व भारतीय आहे. भारतात कोरोनाची महामारी आली आणि आपल्या सार्वजनिक आरोग्य यंत्रणेची वास्तवता समोर आली. आपली सार्वजनिक आरोग्य व्यवस्था नाहीरे वर्गाच्या नावावर आहेरे वर्गासाठीच चालवली जात आहे. एकूण लोकसंख्येच्या फक्त २० टक्के जनतेलाच भारतात सार्वजनिक आरोग्य सेवेच्या माध्यमातून उपचार मिळत आहेत. त्यामुळे ८० टक्के जनता आजही खाजगी हॉस्पीटलवर बिसवून आहेत. सार्वजनिक आरोग्य सेवेसाठी पुरेसे अनुदान, मनुष्यबळ आणि पायाभूत सोयी देण्याबाबत आपल्याला अपयश आलेले आहे. केंद्र व राज्य सरकारे याबाबतीत पुर्णपणे असमर्थ ठरली आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाला एकूण अर्थसंकलनांच्या ४ टक्के तरतूद केली पाहिजे पण प्रत्यक्षात १ ते २ टक्के च्या वरती गेलेली नाही. ग्रामीण भारतात ग्रामीण आरोग्य केंद्रे आहेत पण सरकारच्या अनारचेमुळे सार्वजनिक आरोग्य विभागाला डॉक्टर्स नाहीत, औषधे नाहीत अशी अवस्था आहे गेल्या ७० वर्षात सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेकडे कमालीचे दुर्लक्ष केले आहे. कोरोनाच्या उद्रेकानंतर आपल्याला जाग आलीत्र ज्या उपाययोजना आपण आज करत आहोत. त्या रोगावर नियत्रंणाच्या आहेत. येत्या दहावर्षात सार्वजनिक आरोग्यात गुंतवणूक करावीच लागेल. सार्वजनिक आरोग्यात रोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्राधान्य दयावे लागले. कोरोनासारख्या संकटामुळे आपल्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची मर्यादा स्पष्ट झाली आहे. लॉकडाऊन सारखा प्रतिबंधात्मक उपाययोजना नसती तर आपण कल्पना करु शकलो नसतो कि आपण जीव कसा वाचवायचा....

**४) पाणी उपलब्धतेची समस्या:**

कोरोना व्हायरसवर कोणतेही औषध सध्या नसल्याने लॉकडाऊन पाळणे, स्वच्छता राखणे, कमीतकमी २० सेंकदापर्यंत हात वारवांर धुणे हाच यावरील उपाय आहे. म्हणून तशा मार्गदर्शक सूचनाही सरकारने आणि आरोग्य विभागाने दिल्या आहेत. मात्र जर हात धुण्यासाठी पाणीच नसेल तर काय करायचे हा मोठा प्रश्न भारतासमोर आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकानुसार वारंवार हात धुवावयायाचे असेल तर एका व्यक्तीस दिवसात कमीत कमी दहा वेळा हात धुवेल. एका व्यक्तीला २० सेंकद हात धुण्यासाठी २ लिटर पाण्याची गरज असते. म्हणजे दहा वेळा २० सेंकद हात धुण्यासाठी २० लिटर पाणी लागणार चार सदस्यांच्या कुटुंबासाठी दहा वेळा हात धुण्यासाठी ८० लिटर पाणी लागेल. पण सत्य परिस्थिती अशी आहे कि भारतात निम्या लोकाकडे पाण्याची सोय नाही. एका सर्वेनुसार देशातील एकूण लोकसंख्येच्या केवळ २१ टक्के घरामध्येच पाईपलाईनद्वारे पाणी येते. म्हणजेच ७९ टक्के घरामध्ये थेट पाणी येत नाही. अशा लोकांना पाण्यासाठी कुपतलीका, हातपंप, विहीर, महाराष्ट्राच्या बाबतीत टँकरवर आवलंबून आजपर्यंत पोहवू शकलो नाही. त्यामुळे कोरोनावरील

हात धुण्याचा उपाय आमलात आणण्यात अडचणी येत आहे. आपली राजकीय व्यवस्था स्वच्छ व भरपुर पाणी पुरवण्यात गेल्या ७० वर्षात अपयशी ठरल्याचे दिसते.

अशा प्रकारे कोरोना महामारी आणि प्रतिबंधात्मक उपायाच्या निमित्ताने वरील मर्यादांच्या बरोबरच सोशल डिस्टसिंग सामाजिक अंतराच्याबाबत मुंबईसारख्या ठिकाणी सामाजिक अंतराची आपेक्षा अवास्तव, स्थलांतराच्याबाबत, नोकरीची हमी, उद्योगधंदयाच्या संधीबाबत भारतातील वास्तव, केंद्र शासनाच्या धोरणात्मक अभाव व आदेशाबाबत एकवाक्यता नसल्यामुळे लोकांची संभ्रम अवस्था इत्यादीबाबत राजकीय व्यवस्था आणि प्रशासकीय व्यवस्थाबाबत मर्यादा स्पष्ट होवून सरकारने सर्वच क्षेत्रात गुंतवणूक करुन सक्षमता वाढवणे गरजेचे आहे.

**संदर्भसुची:**

१. दै.लोकसत्ता

२. दै.लोकमत

३. दै.सकाळ

४. दै.देशोन्नती